# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः12.06.2024 वारःबुधवार

---

1. नवीन केंद्रीय मंत्र्यांनी पदभार स्वीकारत केली कामकाजाला सुरुवात

2. पुढच्या शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संस्थांमध्ये वर्षातून दोनवेळा प्रवेश घेता येणार

3. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आढावा

आणि

4. आषाढी यात्रेला जाणाऱ्या भाविकांसाठी ५ हजार विशेष एसटी बसची सोय

**मंत्री-मुंप्रा**

केंद्र सरकारच्या नव्या मंत्रिमंडळातील अनेक नवनियुक्त मंत्र्यांनी आपापल्या पदाचा कार्यभार काल स्वीकारला आणि कामकाजालाही सुरुवात केली. डॉ. एस. जयशंकर यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्री म्हणून पदभार स्वीकारला; अश्विनी वैष्णव यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला तर डॉ. एल. मुरुगन यांनी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारला. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा आणि सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही काल पदभार स्वीकारला. "पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली 'सहकार मंत्रालय' विकसित भारताचा संकल्प साकारण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल" असा विश्वास मोहोळ यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केला.

**UGCद्विवार्षिक**

पुढच्या शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संस्थांमध्ये वर्षातून दोनवेळा विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोग UGCने अशी परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रत्येक शैक्षणिक वर्षात आता जानेवारी, फेब्रुवारी आणि जुलै, ऑगस्ट असे दोनदा प्रवेश घेता येतील. विविध कारणांमुळे प्रवेशापासून मुकावं लागलेल्या विद्यार्थ्यांना हा निर्णय फायदेशीर ठरेल आणि त्यांना प्रवेशाकरिता आणखी एक वर्ष वाट पाहावी लागणार नाही. तसंच नावनोंदणीसाठी प्रतीक्षा वेळ कमी झाल्यामुळे शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळेलं असं यूजीसीचे अध्यक्ष प्राध्यापक एम.जगदेश कुमार यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

**नीट**

सर्वोच्च न्यायालयानं काल राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा–नीटच्या गुणांवर आधारित वैद्यकीय प्रवेशाच्या कौन्सिलिंग प्रक्रियेला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. यंदा 5 मे रोजी घेण्यात आलेली NEET परीक्षा रद्द करण्याच्या याचिकेवर न्यायालयानं नॅशनल टेस्टिंग एजन्सी- NTA ला नोटीस बजावली असून परीक्षेत झालेल्या गैरव्यवहाराबद्दल उत्तर द्यायला सांगितलं आहे. या प्रकारामुळे नीटच्या प्रतिष्ठेवर परिणाम झाल्याचंही सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

**मुख्यमंत्रीआढावा**

राज्यात यंदा चांगल्या पावसाचा अंदाज असून कृषी विभागानं त्या दृष्टीनं खरीप हंगामाचं नियोजन करावं अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिल्या. राज्यातील पाण्याची उपलब्धता आणि पावसाबाबतच्या आढावा बैठकीत ते मुंबईत बोलत होते. शेतकऱ्यांना बियाणं, खतांची टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घ्यावी, टंचाईची स्थिती असलेल्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा आणि चारा छावण्यांसाठी जिल्हा प्रशासनानं प्राधान्य द्यावं, असं मुख्यमंत्री म्हणाले. आपत्तीकाळात सर्व विभागांनी समन्वयानं काम करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**<u>मुख्यमंत्री कृषीमूल्य</u>**

केंद्रीय कृषी मूल्य आणि किंमत आयोगाच्या माध्यमातून पिकांना चांगली किमान आधारभूत किंमत मिळून त्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. केंद्रीय कृषी मूल्य आणि किंमत आयोगाच्या बैठकीमध्ये ते काल मुंबईत बोलत होते. आयोगाचे अध्यक्ष विजय पाल शर्मा यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी आपण लवकरच केंद्रीय कृषिमंत्र्यांना भेटणार आहोत, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<u>नीलम गोऱ्हे</u>**

वीज पडून मृत्यू झालेल्यांच्या वारसांना ज्याप्रमाणे आर्थिक मदत देण्यात येते; त्याच प्रमाणे उष्माघातानं मृत झालेल्या रुग्णांनाही मदत मिळण्याबाबत - नैसर्गिक आपत्तीचा निकष लावण्याचे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले आहेत. यामुळे उष्माघातानं मृत झालेल्या रुग्णांच्या वारसांनाही आर्थिक मदत मिळणार आहे.

**<u>साने गुरुजी</u>**

ज्येष्ठ समाजसेवक आणि साहित्यिक साने गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल त्यांना आदरंजली अर्पण केली. पुणे महानगर पालिकेतही काल साने गुरुजींना आदरांजली वाहण्यात आली.

**<u>आषाढी एस टी बस</u>**

यंदाच्या आषाढी  यात्रेनिमित्त पंढरपुरला जाणाऱ्या भाविकांसाठी राज्य परिवहन महामंडळ ५ हजार विशेष एस टी बस गाड्या सोडणार आहे. याशिवाय कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा जास्त भाविकांनी मागणी केल्यास त्यांच्या गावातूनच  एसटी बस सोडली जाणार असून जवळच्या एस टी आगारात संपर्क साधावा असं आवाहन एसटी महामंडळातर्फे करण्यात आलं आहे.  ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास तसंच महिलांसाठी ५० टक्के सवलत अशा सर्व योजना लागू राहणार आहेत.

**<u>विधान परिषद</u>**

विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी २६ जून रोजी मतदान होत आहे. काही संघटनांनी मतदानाची वेळ वाढवण्यासाठी केलेली मागणी निवडणूक आयोगानं  मान्य केली असून; आता मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत असणार आहे.

**<u>Intro</u>**

वाढतं शहरीकरण आणि प्रदूषणामुळे चिमणीसारख्या पक्षांची किलबिल कमी होत आहे. त्यामुळे शेतातील पिकांवरच्या कीटकांची संख्या वाढत असून पिकांवर रासायनिक फवारणी करावी लागत आहे. बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव इथं राबवलेल्या कृत्रीम घरट्यांच्या उपक्रमामुळे चिमणी आणि इतर पक्ष्यांच्या संख्येत वाढ होत असल्याचं दिसून आलं आहे. निसर्गसंवर्धक पक्षीमित्र संजय गुरव यांनी आकाशवाणीला या उपक्रमाची माहिती दिली . . .

**<u>राज्यपाल पद्मसत्कार</u>**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला जाहीर झालेल्या राज्यातील पद्म पुरस्कार विजेत्यांचा राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते राजभवन इथे काल सत्कार करण्यात आला. वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने या सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी राज्यपालांच्या हस्ते राम नाईक, ज्येष्ठ चित्रपट निर्माते दिग्दर्शक राजदत्त, होर्मुसजी कामा, कुंदन व्यास या पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित व्यक्तींबरोबरच तर उदय देशपांडे, डॉक्टर मनोहर डोळे, डॉक्टर झहीर काझी आणि डॉक्टर चंद्रशेखर मेश्राम या पद्मश्री विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

नंदुरबारच्या पिंप्राणी इथल्या आपल्या भावांचे जीव वाचवणाऱ्या आणि मरणोत्तर प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या- १२ वर्षांच्या आदित्य ब्राह्मणे याच्या लहान भावालाही राज्यपालांच्या हस्ते सन्मानित करण्यात आलं.

**प्यारेलाल**

ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल रामप्रसाद शर्मा यांना काल राष्ट्रपतींच्या वतीनं राज्य शासनामार्फत पद्म भूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आलं. प्यारेलाल शर्मा यांच्या वांद्रे इथल्या निवासस्थानी राज्याचे मुख्य सचिव डॉक्टर नितिन करीर तसंच अपर मुख्य सचिव आणि मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी प्यारेलाल शर्मा यांना हा पुरस्कार प्रदान केला. त्याचबरोबर शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन सत्कार करून त्यांचं अभिनंदन केलं.

**मोसंबी**

जालना जिल्ह्यातल्या बदनापूर मोसंबी केंद्राला दक्षिण कोरिया आणि मुंबईच्या निर्यातदारांनी काल प्रमुख शास्त्रज्ञ डॉक्टर संजय पाटील यांच्या उपस्थितीत भेट देऊन पाहणी केली. यावेळी जालन्याच्या मोसंबी ला जीआय मिळालेला असून याची प्रत, चव, दर्जा उत्तम प्रतीचा असल्याचं डॉ. पाटील यांनी सांगितलं. यावेळी फळांच्या विविध गुणधर्माबाबतची शास्त्रीय माहिती कोरियाच्या प्रवक्त्यांनी जाणून घेतली.

**कॉम्रेडमॅरेथॉन**

दक्षिण अफ्रिकेत झालेल्या जागतिक स्तरावरील मानाच्या कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी निर्धारित वेळेच्या आधीच पूर्ण केलं. सलग दुसऱ्या वर्षी त्यांनी हे यश मिळवलं आहे. अमरावती जिल्ह्यातील सहा धावपटूंनीही सलग ११ तास धावत ९० किलोमीटर अंतर पार केलं. यात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रशिक्षक दिलीप पाटील, दीपमाला साळुंखे-बद्रे, पोलीस निरिक्षक अनिल कुरळकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता मंगेश पाटील, पोलीस कर्मचारी राजेश कोचे, पोलीस निरिक्षक सतिश उमरे यांनी पदक पटकावलं. 86 किलोमीटरहून अधिक अंतर धावण्याची ही स्पर्धा डर्बन इथून सुरू होऊन पीटरमार्टिझबर्ग शहरात पूर्ण झाली. या स्पर्धेत 74हून अधिक देशातील 22 हजारांपेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये 366 भारतीय स्पर्धकांचा समावेश होता.

**बुडूनमृत्यू**

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातल्या बिनागुंडा धबधब्यात बुडून दोघांचा मृत्यू झाला. काल दुपारी ही घटना घडली.

**पाऊस**

राज्याच्या विविध भागात कालही पावसानं हजेरी लावली. सांगली जिल्ह्यातील तासगाव, कवठेमंकाळ आणि पलूस तालुक्यात मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला.

धाराशिव जिल्ह्यात काल सकाळपर्यंत अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

लातूर जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली असून ६ तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झाली. आज तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा ईशारा देण्यात आला आहे.

बुलडाणा जिल्ह्यात कालपासून वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावल्याने जिल्ह्यातील अनेक भागात ओढ्यांना पूर आले. काही ठिकाणी ढगफुटी सदृश पाऊस झाला. खामगाव तालुक्यातील अंबिकापुर इथे वीज पडून २ बैल ठार झाले. सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा इथे पावसामुळे मोठं नुकसान झाल्याचं वृत्त आहे.

अकोल्यातही पावसाने दमदार हजेरी लावली असून 16 जूनपर्यंत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या दोन तीन दिवसात जोरदार पाऊस पडत आहे. अनेक झोपडपट्ट्यांमध्ये पावसाचं पाणी शिरलं होतं. ग्रामीण भागातही अनेक ठिकाणी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने खरिपाच्या पेरणीला गती मिळणार आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वीजा, जोराचे वारे यांच्यासह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. दक्षिण कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार